Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052



# Unit 1

# The Nature and Scope of Philosophy

## घटक 1

## तत्त्वज्ञानाचे स्वरुप आणि व्याप्ती

घटक 1 : अभ्यासक्रम

1. तत्त्वज्ञानाच्या व्याख्या
   **अ) भारतीय व्याख्या:**
   (1)‘तत्त्वज्ञान’ - व्युत्पत्तिशास्त्रीय व्याख्या
   (2)दर्शन - एक तत्त्वज्ञान
   **ब) पाश्चात्य व्याख्या:**
   (1)Philosophy - व्युत्पत्तिशास्त्रीय व्याख्या
   (2)तत्त्वज्ञान म्हणजे विश्वाचे एकत्रित अवलोकन
2. तत्त्वज्ञानाच्या शाखा (पाश्चात्य)

**प्रस्तावना -**

‘तत्त्वज्ञान म्हणजे काय? ’ हा प्रश्न कोणत्याही कालात नेहमीच अतिशय महत्वाचा,मूळ प्रश्न असतो. या प्रश्नाचे उत्तर देणे म्हणजेच तत्त्वज्ञानाचे स्वरूप समजावून घेणे असते. हे स्वरूप दोन रितीने स्पष्ट करता येते. पहिली रित म्हणजे आजपर्यंत कोणते तत्त्वज्ञान निर्माण झाले, त्याचा समाजावर काय परिणाम झाला, आणि समाजाचा तत्त्वचिंतनावर कोणता परिणाम झाला, याचे आकलन करुन घेणे. दुसरी रित म्हणजे आज (कदाचित उद्यासाठी) कोणत्या तत्त्वज्ञानाची गरज आहे, ते कसे निर्माण करता येईल, कोण निर्माण करु शकेल, मुख्य म्हणजे ‘‘मला स्वत:ला या प्रक्रियेत तत्त्वज्ञानाचा निर्माता, वाहक, प्रचारक-प्रसारक, अभ्यासक इत्यादी नात्याने कसा सहभाग देता येईल’’, या दिशेने विचार करणे आणि त्या प्रमाणे प्रयत्न करणे. या दोन्ही कृती व्यक्तिने एकट्याने आणि समूहाने करावयाच्या असतात.

‘तत्त्वज्ञान म्हणजे काय? ’ या प्रश्नाची चर्चा प्राचीन काळी प्राचीन ग्रीक तत्त्ववेत्ता प्लेटो (इ.स.पू.428-347) आणि त्याचा शिष्य ॲरिस्टॉटल (इ.स.पू.384-322) यांनी केली होती. त्यानंतर थेट विसाव्या शतकात तो त्याच यथार्थ रितीने ब्रिटीश तत्त्ववेत्ता गिल्बर्ट राईल (1900-1976) यांनी ती उपस्थित केली, असे मत आधुनिक भारतीय तत्त्ववेत्ते प्रो. सुरेंद्र बारलिंगे (1920-1998)[1] यांनी व्यक्त केले आहे. प्रश्न विचारणे, याचा अर्थ

[1]Prof. S. S. Barlingay, *Confessions And Commitments*,"Indian Philosophy:Retrospect and Prospect", P.70

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*

त्याविषयी चिंतन करणे. काहीएक उत्तर शोधण्याचा प्रयत्न करणे होय. प्लेटो आणि ॲरिस्टॉटल यांच्याखेरिज इतर तत्त्वचिंतकांनी हा प्रश्न उपस्थित केलाच नाही,असे नाही. तथापि ज्या संवेदनशीलतेने आणि तत्त्वज्ञानात्मक जाणीवेने राईलने तो प्रश्न उपस्थित केला आणि जास्तीत जास्त निर्दोष उत्तर देण्याचा प्रयत्न केला, ती पद्धती प्लेटो-ॲरिस्टॉटलच्या संवेदनशीलतेच्या दर्जाची आणि चिंतनाची पद्धती होती, असे प्रो. बारलिंगे सुचवितात.[2]

'तत्त्वज्ञान' या संज्ञेला इंग्लिशमध्ये Philosophy असा शब्द आहे. तत्वज्ञान आणि Philosophy हे शब्द परस्परांची भाषांतरे म्हणून वापरली जातात. तथापि या दोघांच्या अर्थांमध्ये मूलभूतच खूप फरक आहे. त्यासाठी 'तत्त्वज्ञान' आणि Philosophy हे शब्द कसे तयार होतात, ते पाहू.



## व्युत्पत्ति

एखादा शब्द तयार कसा होतो, ते स्पष्ट करणे म्हणजे त्या शब्दाचा उगम, इतिहास आणि अर्थ तपासणे होय. या अभ्यासाला ***व्युत्पत्तिशास्त्र (etymology)***[3] असे म्हणतात. अर्थात एखाद्या शब्दाचा जन्म ज्या कालात व संस्कृतीत होतो, तोच अर्थ पुढे चालू राहातो, असे नाही. तो अर्थ स्थलकालानुसार बदलत जातो. हा बदल सकारात्मक असतो, नवा अर्थ जास्तीत जास्त अचूक व काटेकोर असेल, असे साधारणपणे घडते. तो अर्थ व्यापक आशयाचा होईल, अशी सकारात्मकता त्या प्रयत्नांमागे असते.

'तत्त्वज्ञान' आणि Philosophy या संज्ञांच्या अर्थाबाबत अस बदल होत गेला. या शब्दांच्या व्युत्पत्तिमध्ये सुचविलेला अर्थ आणि नंतरच्या कालक्रमात विकसित होत गेलेला अर्थ, यात फरक पडला.

'तत्वज्ञान' आणि 'Philosophy' या दोन शब्दामधील पहिला प्राथमिकतेने व स्पष्टपणे जाणवणारा फरक असा की 'तत्त्वज्ञान' हा प्राचीन संस्कृत शब्द आहे; तर दुसरा 'Philosophy' इंग्लिश शब्द आहे.संस्कृत ही वैदिक हिंदूंची भाषा आहे. तर इंग्लिश ही युरोपियन भाषा आहे. दोन्ही भाषा प्राचीन आहेत. या दोन्ही भाषा दोन

---

[2] प्रो. बारलिंगे लंडने येथे अभ्यासासाठी गेले असताना त्यांनी काही तत्त्वचिंतकांची व्याख्याने ऐकली. त्यावेळी राईल यांनी What is Philosophy? या विषयावर व्याख्याने दिली होती. ती प्रो. बारलिंगे यांनी ऐकली होती.

[3] (अ)Etymology हा शब्द ग्रीक भाषेतील *etymon* पासून बनतो. *etymon* म्हणजे '' खरा अर्थ / सत्य अर्थ '' ("true sense"). त्यास + *logia* हा उपसर्ग लावून Etymology हा शब्द बनतो. *Logia* म्हणजे ''चा अभ्यास करणे''. म्हणून Etymology म्हणजे 'शब्दाचा खरा अर्थ' शोधणे. त्यामुळे *''व्युत्पत्ति म्हणजे विशेष उत्पत्ति''* असा अर्थ होतो.

संदर्भ: *http://en.wikipedia.org/wiki/Etymology.*

**(ब)**अन्य माहितीनुसार Etymology हा शब्द ग्रीक भाषेतील *etum* पासून बनतो. *etum* ला *logos* हा उपसर्ग लागतो आणि Etymology हा शब्द तयार होतो . http://hi.wikipedia.org/wiki

**(क)**'व्युत्पत्ति'हा शब्द **'व्युत्पद्'**या मूल धातूपासून तयार होतो. व्युत्पद्' म्हणजे मूळाकडे जाणे. म्हणून 'व्युत्पत्ति'हा म्हणजे मूळ. जो अशी मूळे जाणतो किंवा ज्ञान मुळापासून जाणतो तो **'व्युत्पन्न'**. त्याच्या उलट - जो जाणत नाही, अज्ञानी आहे, तो **'अव्युत्पन्न'** (Primitive).संदर्भ:V.S. Apte, *The Practicle Sanskrit Englis Dictionary*, P. 900-901, Sri Satguru Publications, Second Ediciton, Reprinted 2007 ISBN81-7030-190-4.

**(ड)**जगातील पहिले *व्युत्पत्तिशास्त्र* भारतात निर्माण झाले, असे समजले जाते. **'वेद'** या हिंदुंच्या संस्कृत भाषेत लिहिलेल्या प्राचीन ग्रंथातील मंत्रांचा अर्थ कालांतराने समजेनासा झाल्यामुळे त्यांचा अर्थ स्पष्ट करण्यासाठी भारतीय विद्वान ऋषिमुनींनी अवघड शब्दांचा संग्रह - शब्दकोश बनविला, त्यास **'निघण्टु'** असे नाव आहे. नंतर 'निघण्टु'तील शब्दांचा अर्थ आणि शब्दांचे मूळ शोधण्यासाठी **'निरुक्त'** नावाचे ग्रंथ लिहिले गेले. असे चार प्रमुख ग्रंथकार आहेत: यास्क, पाणिनी, कात्यायन, पतंजलि. या सर्वांनी किमान 12 निरुक्त ग्रंथ लिहिले असावेत, असे समजले जाते. यापैकी आज फक्त यास्काचार्यांचे निरुक्तग्रंथ उपलब्ध आहेत. इतर ग्रंथ नष्ट झाले!

**(ई)**अभिजात ग्रीक कालातील प्लेटोने (Plato)लिहिलेल्या 'सॉक्रेटीसच्या संवादां' (the Socratic dialogue) पैकी 'क्रिटीलस' (*Cratylus*- इ.स.पू. 360)या संवादाला *पहिल्या पाश्चात्य युत्पत्तिशास्त्र ग्रंथाचा* दर्जा दिला जातो. या संवादात सॉक्रेटीस अनेक शब्दांचे विशेषत: देवांच्या नावाचे अर्थ शोधतो.

DEPARTMENT OF PHILOSOPHY SANGAMNER COLLEGE

Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052



भिन्न संस्कृतीत विकसित झाल्या आहेत. साहजिकच त्यांच्या मूळ अर्थांमध्येही बदल आहेत. आहेत. 'Philosophy' हा इंग्लिश शब्द असला तरी त्याचे मूळ मात्र प्राचीन ग्रीक भाषेत आहे.

आपण आधी भारतीय संस्कृतीतील 'तत्त्वज्ञान' या संज्ञेचा अर्थ पाहू :

### अ) 'तत्त्वज्ञान' संज्ञेची भारतीय व्याख्याः

#### (1)'तत्त्वज्ञान' - व्युत्पत्तिशास्त्रीय व्याख्या ('तत्त्वज्ञान' शब्दाची व्युत्पत्ति)

| | |
|---|---|
| तत्त्वज्ञान | = तत्त्व + ज्ञान |
| तत्त्व | = 'तत्' + त्व |
| 'तत्' | = 'ते' - सर्वनाम |
| 'तत्' चा तत्पणा | = तत्त्व |
| तत्त्वाचे ज्ञान | = म्हणजे तत्त्वज्ञान. |

तत्त्व[4] म्हणजे पदार्थाचे यथार्थ स्वरूप किंवा सार.

म्हणून तत्त्वज्ञान म्हणजे पदार्थाचे यथार्थ ज्ञान !

आता, पदार्थ म्हणजे काय? तर, व्याकरणदृष्ट्या 'पदार्थ' म्हणजे पदाचा अर्थ. पदाला / शब्दाला अर्थ असणे म्हणजे पदार्थ. पद ज्याला उद्देशून वापरले जाते तशी वस्तुस्थिती असणे म्हणजे 'पदार्थ' होय. तशी वस्तुस्थिती नसेल तर ते पद निरर्थक असते. जग वस्तुस्थितींनी बनलेले असते; ते वस्तुस्थितींची रचना असते.[5] ती वस्तुस्थिती भाषेत मांडणे म्हणजे पद अर्थपूर्ण बनणे होय. म्हणून पदार्थ म्हणजे दृश्य जग, समग्र अस्तित्व. म्हणून 'ते' याचा अर्थ 'सर्व काही'.

येथे 'सर्व' याचा अर्थ ''जे जे अस्तित्वात आहे ते ते सर्व''. म्हणजेच अखिल विश्व होय. या विश्वाचे सार, स्वरूप किंवा स्वभाव जाणणे म्हणजे तत्त्व जाणणे = तत्त्वज्ञान. मनुष्याचे सार म्हणजे मनुष्यत्व, पशुचे सार म्हणजे पशुत्व, खुर्चीचे सार ते खुर्चीत्व. एखाद्या पदार्थाचे तत्त्व किंवा 'त्व'पणा जाणणे याचा अर्थ त्या पदार्थाचे घटक आणि त्यांचा परस्परसंबंध जाणणे होय. जसे की फुलाचे सार किंवा पुष्पत्व जाणणे म्हणजे फुलाचा रंग, गंध, आकार, वजन, त्याचा वृक्ष इत्यादी घटक जाणणे आणि त्यांचा आंतरसंबध जाणणे होय.

तत्त्वज्ञान याचा अर्थ वस्तुस्थिती, सत्य, यथार्थ स्वरूप, मूल घटक, मन, शरीर देवता, तात्पर्य असेही अर्थ दिले जातात. या संदर्भातील एक वचन[6] '*सतश्च सद्‌भाव असताश्चा सद्‌भाव*' म्हणजे ''सत् आणि असत् हे जसे ग्रहण केले असेल, तसे असणारे आणि त्या विरुद्ध न होणारे ते तत्त्व'' असे आहे.

### 'तत्' आणि '*इदम्*'

'तत्त्वज्ञान' या संज्ञेची व्युत्पत्तितील 'तत्' या शब्दाच्या विरूध्दचा शब्द म्हणजे ***'इदम्'***. 'तत्' म्हणजे '*ते*' आणि '*इदम्*' म्हणजे 'हे'. ज्या कशाचाही आपण अनुभव घेवू शकतो किंवा निर्देश करू शकतो त्या सर्वांचा

---

[4] 'तत्' चा तत्पणा = तत्त्व, असे म्हंटले असले तरी व्याकरणदृष्ट्या 'तत्' या शब्दाला 'त्व' हा भाववाचक प्रत्यय लागून 'तत्त्व' असा शब्द बनतो. 'तत्त्व' पासून तत्त्वनिष्ठ, तत्ववादी, तत्त्वत:, तात्त्विक,तत्त्वमसि, ही नवी पदे तयार होतात.

[5] हे मत विसाव्या शतकात विट्गेन्टाईन (1889-1951) या जर्मन तत्त्ववेत्त्याने मांडले.

[6] भारतीय संस्कृतिकोश, खंड चौथा, संपादक - पं. महादेव शास्त्री जोशी, भारतीय संस्कृतिकोश मंडळ, 410 शनिवार पेठ, पुणे 30 , पुनर्मुद्रण 2003 पान 298-99.

DEPARTMENT OF PHILOSOPHY SANGAMNER COLLEGE

Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052



समावेश 'इदम् ' मध्ये होतो. जगातील सर्व वस्तू, व्यक्ति घटना, पदार्थ आणि अखिल ब्रह्माण्ड म्हणजे 'इदम् 'होय. प्रत्यक्ष ज्ञानेंद्रिये अथवा त्यांचा विस्तार असलेली कोणतीही इतर विज्ञान - तंत्रज्ञाने यांच्या साह्याने होणारे ब्रह्माण्डाचे ज्ञान 'हे '- 'इदम् ' असते.

या वरील अर्थाने जे काही 'हे' होवू शकत नाही त्या वस्तू इत्यादीला 'ते' म्हणजे 'तत्' म्हणावयाचे . आज जरी काहीएक वस्तू ज्ञात नसली ('ते' असली तरी) ज्या क्षणाला ती ज्ञात होईल त्या क्षणाला तिचे 'तत्पण' संपेल व ती 'इदम' मध्ये सामावली जाईल. ('हे ' होईल). या विश्वाचे मानवाचे ज्ञान जसजसे वाढत जाईल तसतसे अज्ञात विश्व 'इदम्' मध्ये येईल. ज्ञाताच्या कवेत येईल. 'इदम्'चे ज्ञान होणे म्हणजे विश्वाचे सारतत्त्व कळणे. सारतत्त्वाचे ज्ञान हेच तत्त्वज्ञान बनते.

### (2)दर्शन - एक तत्त्वज्ञान

'तत्त्वज्ञान' या संज्ञेची व्युत्पत्तिशास्त्रीय व्याख्या पाहिल्यानंतर आता, 'दर्शन' या संज्ञेची व्युत्पत्ति आणि तिचा अर्थ पाहणे आवश्यक आहे.

आज ज्यास 'तत्त्वज्ञान' म्हणून ओळखले जाते, त्यास प्राचीन भारतात *'दर्शन'* म्हंटले जाते. *'दर्शन'* ही खास भारतीय संकल्पना आहे. सामान्य व्यवहारातील 'देवदर्शन' या शब्दातून या संकल्पनेचा अर्थ काही प्रमाणात व्यक्त होतो. दैंनदिन व्यवहारात देवदर्शन म्हणजे मूर्तीकडे घाईघाईत बघून घेणे, कसातरी नमस्कार करणे, असे घडते.( खरे तर 'बघणे' सुध्दा धडपणे होत नाही). 'दर्शन' चा साधारण अर्थ भेटणे. कधीतरी भेटणे म्हणजे *दर्शन अलभ्यम्.*

संस्कृतमधील 'दृश्' या धातूपासून *दर्शन* ही संज्ञा बनते. 'दृश्' पासून दृश्य शब्द तयार होतो.

- जे दिसते ते किंवा पाहण्याचा विषय म्हणजे **'दृश्य'**.
- दृश्य पाहणारी व्यक्ति ती **'द्रष्टा'**.
- द्रष्ट्याला जे दिसते किंवा होते ते **'दर्शन'**.

म्हणून दर्शन घेतो तो **दार्शनिक** (द्रष्टा). आणि **दर्शन** म्हणजे पाहण्याची क्रिया, जे पाहिले जाते ते **दृश्य.**

'दर्शन' या शब्दाचा मूलार्थ दृष्टि.[7] *दृश्* म्हणजे पाहणे. म्हणून दर्शन म्हणजे चाक्षुष ज्ञान[8], आलोकन, ईक्षण[9]. डोळ्याने प्रत्यक्ष पाहणे. अन्य ज्ञानेंद्रियांच्या तुलनेत डोळा हे सत्याच्या जवळ असणारे ज्ञानेंद्रिय असल्याने अंतिम सत्य शोधणाऱ्या अध्यात्मशास्त्राला 'दर्शन' असे म्हणतात. चक्षुचे महत्व जाणूनच 'चक्षुर्वै सत्यम्'[10] अथवा 'चक्षुर्वै प्रतिष्ठा'[11] असे म्हंटले जाते.

[7] बौध्द तत्त्वज्ञानात *दर्शन* या संज्ञेला 'दिठ्ठी' असे म्हंटले आहे. तसेच जैन तत्त्वज्ञानातही 'दर्शन' ही संज्ञा उपयोगात आणली गेली आहे. दर्शन उपयोग, केवल दर्शन (अनंत दर्शन) आणि सम्यक दर्शन. अर्थात इथे अधिक विस्तार करण्याचे कारण नाही. 'दिठी' ही संज्ञा ज्ञानेश्वरीत (2.26) 'दृष्टि' या अर्थाने वापरली गेली आहे.

[8] चक्षु= डोळा, चाक्षुष ज्ञान = डोळ्याने प्रत्यक्ष होणारे थेट ज्ञान.

[9] ईक्षण = ईक्ष = पाहणे, अनुभवणे. ईक्षणं = पाहण्याची चालू क्रिया. ईक्षिका = डोळा. संदर्भ:V.S. Apte, *The Practicle Sanskrit Englis Dictionary*, P. 251, Sri Satguru Publications, Second Edition, Reprinted 2007 ISBN81-7030-190-4.

[10]बृहदारण्यकोपनिषद 5.14.4

[11] बृहदारण्यकोपनिषद 6.1.3

Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052



'दर्शन' या संज्ञेच्या सर्वमान्य दोन व्याख्या सांगण्यात येतात :

(अ) 'दृश्यते हि अनेन इति दर्शनम्'

म्हणजे 'सत् आणि असत् यांचे ज्ञान म्हणजे दर्शन'

किंवा

'दृश्यते यथार्थ तत्त्वम अनेन इति दर्शनम् '

म्हणजे ''ज्याच्या योगाने यथार्थ तत्त्व पाहिले जाते ते शास्त्र म्हणजे दर्शन.

यातील 'दृश्यते अनेन' याचा अर्थ 'याच्याकडून पाहिले जाते'.

(ब) ' तत्त्वज्ञान साधनं शास्त्रम

म्हणजे *'तत्त्वाचे ज्ञान होण्याला साधक असे शास्त्र म्हणजे दर्शन'*. (न्यायकोश) याचा अर्थ ज्या शास्त्राच्या द्वारे लौकिक आणि पारलौकिक तत्त्वांचे यथार्थ ज्ञान होते, त्याला जाणणे. *''तत्त्वज्ञानसाधनशास्त्रदर्शनम्''* - 'तत्त्वज्ञानाच्या साधनशास्त्राचे दर्शन' असे म्हंटले आहे.

**तत्त्वज्ञान म्हणजे ब्रह्मज्ञान**

भारतीय दर्शनशास्त्रात वेदान्त दर्शन हे एक दर्शन आहे. या वेदान्ताला अनुसरून तत्त्वज्ञानाची मर्यादित कल्पना मांडली जाते. *ब्रह्म हे एकच अंतिम तत्त्व* असून त्याचे ज्ञान म्हणजे तत्त्वज्ञान, म्हणून तत्त्वज्ञान म्हणजे ब्रह्मज्ञान होय, अशी ती कल्पना वेदान्तात मांडली आहे.

अद्वैत वेदान्त दर्शनाचे रचियते आदि शंकराचार्यांच्या मतानुसार तत्त्वज्ञान म्हणजे ब्रह्मज्ञान होय. ते म्हणतात, '' तदति सर्वनाम सर्व च ब्रह्म तस्यनाम । तद् भावस्तत्वं ब्रह्मणो याथात्म्यम '' - याचा अर्थ असा, ''तत्त्व हे सर्वनाम. सर्वनाम म्हणजे विश्वातील सर्व पदार्थांना लागू पडणारे तत्त्व. ब्रह्म व्यापक असल्याने सर्व पदार्थांना व्यापून आहे. म्हणून त्याचे 'तत्' हे नाव.'' या ' तत् ' भाव या अर्थी 'त्त्व' प्रत्यय लागून 'तत्त्व' शब्द बनला. म्हणून 'तत्त्व' = 'ब्रह्म' असे असे समीकरण बनले. परिणाम 'तत्त्वज्ञान' = 'ब्रह्मज्ञान'असे समीकरण तयार होते.

पण हा मर्यादित अर्थ आहे.याची दोन कारणे आहेत. एक कारण असे की बौध्द दर्शनासारखी काही दर्शने *ब्रह्म* ही संकल्पना स्वीकारत नाहीत. ते 'शून्य' हे तत्त्व मानतात. दुसरे कारण असे की Philosophy या इंग्रजी शब्दाचा *पर्यायी शब्द* म्हणून तत्त्वज्ञान शब्द वापरला जातो, त्यावेळी ब्रह्मज्ञान हा अर्थ संकुचित होतो.म्हणूनच तत्त्वज्ञान म्हणजे ब्रह्मज्ञान हा 'तत्त्वज्ञान ' शब्दाचा अर्थ नाही. तो फार तर एक दृष्टिकोन होईल. तत्त्वज्ञान म्हणजे ब्रह्मज्ञान असे म्हणणे, तशी व्याख्या करणे चुकीचे, दिशाभूल करणारे होवू शकते, हे लक्षात ठेवणे आवश्यक आहे.

या प्रमाणे वास्तवाचे किंवा समग्र सृष्टिचे अस्तित्व जाणणे म्हणजे तत्त्वज्ञान होय. म्हणूनच तत्त्वज्ञानात दोन प्रश्न महत्वाचे मानले जातात :

1) जग म्हणजे काय ? हे जग काय आहे ? या जगाचे स्वरूप काय आहे ? या जगाचे कार्य कसे चालते?

2) मानवी जीवनाचा अर्थ काय? जीवनाला काही उद्दिष्ट आहे काय ?

जग म्हणजे काय ? हा मूलभूत प्रश्न आहे. जग समजावून घेणे, याचा आजूबाजूची माणसे, त्यांचे वर्तन व्यवहार तसेच निसर्ग व निसर्गातील घडामोडी समजावून घेणे असते. या प्रश्नाचे उत्तर शोधताना निसर्ग विज्ञाने

DEPARTMENT OF PHILOSOPHY SANGAMNER COLLEGE

Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052



(भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र इ.) आणि सामाजिक विज्ञाने (समाजशास्त्र,राज्यशास्त्र,अर्थशास्त्र इ.)यांचा विकास होतो.

जगाचे कार्य कसे चालते? या प्रश्नाचा अर्थ समजावून घेताना माणसाला कारण कल्पना सुचली. ती अशी की प्रत्येक वस्तू, प्राणी अन्य कशापासून तरी निर्माण होताना आढळते. प्रत्येक वस्तूला अथवा घटनेला कारण असते. विनाकारण काही निर्माण होत नाही अथवा काही घडत नाही. जसे की प्रत्येक प्राण्याला आईवडिल असतात, किंवा चपाती, पुरी किंवा पराठा, खीर हे पदार्थ गहू या द्रव्यापासून बनतात. गहू हे कारण असते. खुर्ची, पलंग, टेबल, बाकडे या वस्तू लाकूड या द्रव्यापासून बनतात. येथे लाकूड हे कारण असते. चपाती, पुरी किंवा पराठा, खीर खुर्ची, पलंग, टेबल, बाकडे ही कार्ये आहेत. कोणत्याही कार्यामागे कारण असते. आणि ती निर्माण होण्याची प्रक्रिया असते. असाच विचार जगासंबंधी होतो; आणि मग ***'जग कशापासून निर्माण झाले?'*** *किंवा* ***'जग कुणी निर्माण केले?'*** अथवा ***'जगाचे कारण कोणते?'*** असे प्रश्न निर्माण होतात. जग हे कार्य असेल तर जगाचे कारण कोणते ?

साहजिकच 'जग ज्यापासून निर्माण झाले असावे, अशी कल्पना केली जाते, ते मूळ तत्त्व' किंवा ***'मूळ कारण म्हणजे काय?*** असा आणखी एक प्रश्न उपस्थित होतो. मूळ कारणाचे ज्ञान होणे, हेही तत्त्वज्ञान होय. तसेच जगाचे कार्य म्हणजे जगातील इतर घडामोडी मागील कारणे कोणती? ती तत्त्वे कोणती? तर उदाहरणार्थ, कार्यकारणभाव किंवा निसर्ग नियम अथवा समाजाचे नियम. अशा नियमांचे ज्ञान करुन घेणे म्हणजे तत्त्वज्ञान मिळविणे होय.

अशा रितीने भारतीय वैचारिक परंपरेत 'तत्त्व' हा शब्द *कोणत्याही गोष्टीचे सारतत्त्व* या अर्थाने वापरला गेला आहे. म्हणून तत्त्वज्ञान म्हणजे विविध महत्वाच्या गोष्टींचे ज्ञान किंवा वस्तुस्थितीच्या यथार्थरूपाचे ज्ञान होय. या यथार्थरूपालाच सार (essence) असे म्हंटले गेले. त्याचे ज्ञान होणे हे सुद्धा तत्त्वज्ञान मानले गेले आहे. म्हणून *तत्त्वज्ञान = सारतत्त्वाचे ज्ञान* असा ही अर्थ होतो.

थोडक्यात, तत्त्वज्ञान या शब्दाच्या व्युत्पत्तीनुसार तत्त्वाचे ज्ञान म्हणजे तत्त्वज्ञान होय. तत्त्वे दोन प्रकारची असतात.

1)जगाच्या अस्तित्वाची कारणतत्त्वे

2)मानवी कृतीची कारणतत्त्वे.

## जीवनदर्शन म्हणजेच तत्त्वज्ञान

तत्त्वज्ञानाचे आकलन हेच जीवनदर्शन असते, असे प्राचीन भारतीयांचे मत आहे. तत्त्वविचार सुचणे, ते जीवनात प्रत्यक्षात अमलात आणणे हेच जीवनाचे मार्गदर्शन असते. जीवनविषयक विचारांचे एक स्वतंत्र जग असून योग्य अधिकारी साधकापुढे 'तात्त्विक विचार स्वत:हून प्रगट होवून त्यास दर्शन देतात ', अशी प्राचीन भारतीय ऋषिंची किंवा भारतीय विचारवंतांची श्रध्दा होती. अशी धारणा होती की मंत्र त्यांना प्रत्यक्ष दर्शन देत असत मंत्रानी खुद्द ऋषिंपुढे अवतरणे, प्रगट होणे म्हणजे दर्शन*(ऋषिर्दर्शनात्)*[12].. अर्थात मंत्रांनी अथवा विचारांनी दर्शन देणे याचा अर्थ 'विचार स्फुरणे - सुचणे', असा घेतला पाहिजे.

हे 'दर्शन'ऋषिंना दोन प्रकारे झाले असावे, असे मत श्री. र. प. कंगले[13] यांनी मांडले आहे. ज्यांना 'भारतीय दर्शन' असे म्हंटले जाते, तो नऊ तत्त्वप्रणालींचा एकत्रित समूह आहे. त्यांची रचना अनेक शतके होत

[12] र.प.कंगले *सर्वदर्शनसंग्रह* पान । - महाराष्ट्र राज्य साहित्य मंडळ प्रथमावृत्ती 1985

[13] र.प.कंगले *सर्वदर्शनसंग्रह* पान । - महाराष्ट्र राज्य साहित्य मंडळ प्रथमावृत्ती 1985

DEPARTMENT OF PHILOSOPHY SANGAMNER COLLEGE

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*



होती. इ.स.पू. 600 ते 200 वर्षांपासून ही रचना होत गेली[14], असे समजण्यात येते. या रचनांचे दोन प्रकार करता येतात. पहिला प्रकार म्हणजे फार प्राचीन काळी ऋषिमुनींना सुचलेले विचार आणि दुसरा प्रकार म्हणजे नंतरच्या कालखंडात या विचारांना जाणीवपूर्वक दिले गेलेले सुव्यवस्थित रूप. प्राचीन कालीन ऋषिंमुनींना जे विचारदर्शन झाले ते काव्यात्म प्रतिभेच्या स्वरूपाचे होते. ते विचार त्यांना स्फुरले. जसे स्फुरले तसे त्यांनी मांडले. त्यानंतर त्या विचारांना नीट सुव्यवस्थित रुप दिले गेले. जगाचे आणि मानवाचे वर्तन यांचे सखोल निरीक्षण करुन व त्यावर आधारित चिंतन मांडले गेले, असे मत श्री. कंगले मांडतात. या दर्शनांची सुव्यवस्थित मांडणी केल्यानंतर या दर्शनांनाच *'शास्त्र'* म्हंटले गेले.

अशी मांडणी पूर्ण झाल्यानंतर 'दर्शन'किंवा 'तत्त्वज्ञान' या संज्ञेची जवळपास परिपूर्ण व्याख्या तयार झाली. ती म्हणजे ''जग आणि त्यातील मानवी जीवन याकडे विचारपूर्वक पाहिले असता (तत्त्व)चिंतकाला जाणवणारे त्यांचे स्वरूप म्हणजेच चिंतकाला झालेले *दर्शन*'', असे श्री. कंगले म्हणतात.

समग्र वस्तुस्थितीचे नेमके स्वरूप काय आहे ? या वस्तुस्थितीचे ज्ञान कोणत्या प्रमाणांनी म्हणजे साधनांनी होवू शकेल ? मानवी जीवनाची इतिकर्तव्यता कशात सामावलेली आहे ? मानवी जीवनाचे अंतिम ध्येय कोणते ? ते साध्य प्राप्त करून घेण्याचा मार्ग कोणता ? या साऱ्याविषयीचा समग्र दृष्टिकोन म्हणजे *दर्शन* होय.अशा विविध दृष्टिकोनांची चर्चा ज्यात केली जाते ते शास्त्र म्हणजे *दर्शनशास्त्र* होय.भारतीय तत्त्वज्ञानाची माहिती देणारी शास्त्रे ती *दर्शनशास्त्रे* होय.त्यामुळे *दर्शनशास्त्रे* म्हणजे तत्त्वज्ञान असेही समीकरण झाले.त्याचे कारण तत्त्वज्ञान म्हणजे तत्त्वांचे ज्ञान असे समीकरण आहे.

भारतीयांचे प्रयत्न तात्त्विक विचारांमार्फत अंतिम सत्याचे ज्ञान केवळ पुस्तके वाचून, कुणाकडून तरी समजावून घेवून अथवा गुरु चरणी बसून बौद्धिक, वैचारिक पातळीवर अप्रत्यक्ष रित्या व्हावे ; असा नव्हता तर अंतिम सत्याचे 'साक्षात दर्शन' व्हावे यासाठी होता ! 'चक्षुर्वै सत्यम्' चा हा अर्थ आहे. बौद्धिक पातळीवर सत्यज्ञान प्राप्त करणे ही पहिली पायरी आहे. तिथून साधकाने, सत्यप्रेमीने पुढे जावून त्या सत्यज्ञान प्राप्तीच्या निश्चयाचे रुपांतर साधनेत, अनुभवात केले पाहिजे, अशी अपेक्षा असते. म्हणूनच अंतिम सत्य मानलेल्या *आत्मा* किंवा *ब्रह्म* यांचे दर्शन म्हणजे 'आध्यात्मिक अनुभव' असे उपनिषदे[15] म्हणतात. या पातळीवर विचारांचे दर्शन हे केवळ 'विचार करणे' उरत नाही तर द्रष्ट्याने 'स्वत:च तो विचार होणे' असते. हा 'अहं ब्रह्मास्मि' चा साक्षात्कार असतो.[16] स्वत:च विचार होणे याचा अर्थ विचारानुसार आचरण करणे. आचार व विचार एक करणे हे जीवनदर्शन किंवा तत्त्वज्ञान होय.

**परीक्षण**

थोडक्यात, *'दर्शन'* चे दोन अर्थ स्पष्ट करता येतील.

1. समग्र अस्तित्व हे एक गूढ आहे, हे जाणून त्याकडे मर्मभेदकतेने पाहाणे, त्याचे स्वरूप आणि त्याच्याशी असलेले माणसाचे नाते जाणणे.

---

[14] 'भारतीय दर्शन' च्या निर्मितीचे साधारणत: वेदकाल आणि वेदोत्तर काल असे दोन भाग केले असून त्यातील वेदोत्तर कालाचे पुन्हा दोन भाग केले आहेत. (1) वेदोत्तर कालाचा पूर्वार्ध आणि (2) वेदोत्तर कालाचा उत्तरार्ध. या उत्तरार्धास 'दर्शनांचे युग' असे संबोधले आहे. पाहा : हिरियण्णा , ''भारतीय तत्त्वज्ञानाची रुपरेषा'', अनुवाद - भा. ग. केतकर,प्रथमावृत्ती जानेवारी 1973, प्रकाशक व मुद्रक -पुणे विद्यापीठ, पुणे

[15] बृहदारण्यकोपनिषद 2.4.5 - 'आत्मा वा अरे द्रष्टव्य: '

[16] सत्याचे दर्शन घेणे म्हणजेच आपण स्वत:च तसे होणे, अशी भूमिका प्राचीन ग्रीक तत्त्वज्ञांचीही होती.उदाहरणार्थ प्लेटोच्या चैतन्यवादात अंतिम शिवतत्त्वाशी एकरूपता साधणे , सायुज्जता साधणे अपेक्षित आहे .अशा रितीने 'दर्शन ' ही संज्ञा अंतिम सत्याशी बौद्धिक आणि भावनिक नाते जोडते.या नात्याचा श्रीगणेशा साधकाच्या स्वत: सत्यात परिवर्तीत होण्यात आढळतो.

DEPARTMENT OF PHILOSOPHY SANGAMNER COLLEGE

Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052

2. प्राचीन भारतीय ऋषींची अशी धारणा होती की मंत्र त्यांना *प्रत्यक्ष दर्शन* देत असत *(ऋषिर्दर्शनात्)*. मंत्रानी खुद्द ऋषींपुढे अवतरणे, प्रगट होणे म्हणजे दर्शन.

यातील पहिला अर्थ विश्लेषणात्मक असून भारतीय परंपरेसह पाश्चात्य परंपरेलाही सामावून घेणारा तो महत्वाचा मुद्दा आहे.दुसरा अर्थ खास भारतीय आहे. अर्थात "अमूर्त विचारांना भौतिक वस्तूसारखे अस्तित्व नसताना ते कसे प्रगट होतील?" असा प्रश्न न विचारता त्या भूमिकेमागील चिंतकऋषींच्या सत्याविषयीच्या भावनिक तीव्रतेचा व उत्कटतेचा आदर राखून तो अर्थ स्वीकारणे योग्य होईल.तात्त्विक विचारांचा दर्जा सामान्य विचारापेक्षा वेगळा असतो,असे त्यांना लक्षात आणून द्यावयाचे आहे, याची नोंद घेतली पाहिजे एवढेच.



***भारतीय तत्त्वज्ञान*** **की *'भारतीय दर्शने'?***

भारतीय तत्त्वज्ञान विविध विचारधारांमध्ये किंवा विचारप्रणालींमध्ये विभागले गेले आहे. या प्रणालींनाच 'दर्शन' असे नाव आहे.त्यांनाच इंग्रजीत System असे नाव आहे. ते अर्थातच दिशाभूल[17] करणारे आहे. त्यामुळे ***भारतीय तत्त्वज्ञान*** असे न म्हणता ***'भारतीय दर्शने'*** किंवा ***'भारतीय दर्शनशास्त्रे'*** म्हंटले पाहिजे.जसे वेदान्त द्र्शन, योग दर्शन इ. येथे दर्शन म्हणजे दृष्टिकोन.

भारतात तत्त्वज्ञानाचा अभ्यास आणि विकास दर्शनांच्या म्हणजे तात्त्विक प्रणालीच्या माध्यमातून झाला.पाश्चात्य तत्त्वज्ञानाचा विकास असा दर्शनाच्या माध्यमातून झाला नाही.त्यामुळे *दर्शनशास्त्र* हा शब्द भारतीय तत्त्वज्ञानालाच चपखलपणे लागू होतो, पाश्चात्य तत्त्वज्ञानाला नाही.

## भारतीय वाङमयातील दर्शनांचे स्थान

'वेद'हे हिंदु धर्म आणि जीवनपद्धती यांचे आधारभूत साहित्य समजले जाते. वेदवाङमय अफाट आहे ही गोष्ट खरी असली तरी त्याचे अध्ययन व चिंतनासाठी सहा विभाग केले जातात. श्रुति, स्मृति, इतिहास, पुराणे, आगम आणि दर्शने. यातील पहिले चार विभाग अंत:प्रज्ञात्मक (तार्किक विचार करुन मांडलेले), पाचवा विभाग अंत:स्फूर्त (स्फुरलेले) आणि भावनिक समजला जातो तर सहावा विभाग 'दर्शने' हा वैचारिक, बौद्धिक समजला जातो.

आगम साहित्य धर्मशास्त्रीय आहे तर दर्शन साहित्य तत्त्वज्ञानात्मक आहे. दर्शने ही, तीक्ष्ण बुद्धिमत्ता, कुशाग्र आकलनक्षमता, धारदार तर्कशक्ति आणि सूक्ष्म प्रज्ञान धारण करणाऱ्या काहीजणांसाठी निर्माण झालेले गहन तत्त्वज्ञान आहे, अशी प्राचीन भारतीयांची धारणा आहे. इतिहास, आगम आणि पुराणे हे वाङमय मात्र सर्वसामान्यांसाठी आहेत, असाही समज आहे.

**ब) पाश्चात्य व्याख्या:**

(1)Philosophy - व्युत्पत्तीशास्त्रीय व्याख्या ('Philosophy' शब्दाची व्युत्पत्ती)

**'Philosophy' शब्दाचा अर्थ :**

Philosophy = Philos + Sophia
= Philein + Sophia
Philein = Love = प्रेम

---

[17] Prof. S. S. Barlingay, "Reunderstanding Indian Philosophy", *Reunderstanding Indian Philosophy*, D. K. Printworld, New Delhi.

DEPARTMENT OF PHILOSOPHY SANGAMNER COLLEGE

Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052



Sophia = Wisdom = प्रज्ञान / सुज्ञान
Philosophy = Love of Wisdom
= प्रज्ञानाविषयी प्रेम.

Philosophy हा शब्द Philos आणि Sophia[18] यांच्या समासातून बनतो. *Philo* किंवा Philos[19] या शब्दाचा मूळ ग्रीक धातू Philein असून त्याचा अर्थ Love आणि Sophia म्हणजे Wisdom. त्यामुळे Love of Wisdom = Philosophy.[20] म्हणून Philosophy = प्रज्ञानाविषयीचे प्रेम.

प्रज्ञानाचे स्वरूप (The Nature of Wisdom)

ग्रीकांना या व्याख्येतून नेमके काय म्हणावयाचे आहे, हे थोडे पाहू :

साधारणत: आपण प्रेम करतो ते एक तर आपल्या प्रिय वस्तूवर अथवा व्यक्तीवर. व्यक्तिंना अथवा वस्तूंना लांबी,रुंदी,रंगरुप इत्यादी स्वरुपाचे भौतिक गुणधर्म असतात.त्यांच्यावर प्रेम करणे हे नेहमीचेच झाले. समजा भौतिक वस्तूंप्रमाणे अभौतिक पदार्थावर प्रेम करता येईल काय, असा प्रश्न उपस्थित केला तर? उदाहरणार्थ मन, आत्मा,ईश्वर, ज्ञान, किंवा खुद्द प्रेम याच संकल्पना घेतल्या तर त्यांच्यावर प्रेम करणे कसे शक्य आहे ? या *अमूर्त संकल्पना* आहेत म्हणजे त्यांना केवळ मानसिक,ज्ञानात्मकच अस्तित्व आहे.

ग्रीक विचारवंतांच्या मते प्रज्ञान (Wisdom) हा सुध्दा असाच एक मानसिक पदार्थ आहे.ती संकल्पना आहे.ती भौतिक वस्तू नाही. या प्रज्ञानावरील प्रेम म्हणजे Philosophy. आता प्रश्न असा उपस्थित करता येईल

---

[18]*sophos* = wisdom या शब्दापासून इंग्लीशमध्ये काही शब्द बनतात.ते पुढीलप्रमाणे :

- *Sophist* = one who loves knowledge ज्ञानावर प्रेम करणारा.
- *Sophomore* = wise = ज्ञान and *moros* = foolish मुर्ख; *i.e.* one who thinks he knows many things. म्हणून *sophomore* = ज्ञानमुर्ख माणूस. याचा अर्थ " मला खूप ज्ञान आहे" असे समजणारा माणूस.
- *Sophisticated* = one who is knowledgeable •याच्याकडे खूप ज्ञान आहे, पण तो ते विकत देतो, भाडोत्री विद्‌वान, असा विद्‌वान. अधिक माहितीसाठी क्रमांक 7 ही टीप पाहा.

[19]*Philo*=love of, affinity for, liking of something. 'Philos' या शब्दापासून इंग्लीशमध्ये पुढीलप्रमाणे काही शब्द बनतात.

- *Philander* = to engage in love affairs frivolously आनंदाने कशाच्या तरी प्रेमात पडणे. पण प्रेम करणे, याचा अर्थ मालकी दाखविणारे, हिंसात्मक विकृत प्रेम न करणे.
- *Philanthropy* = love of mankind in general मानवजातीविषयी प्रेम.
- *Philately* = postage stamps hobby पोष्टाची तिकिटे जमविण्यावर प्रेम करणे.
- *Phile* = (as in "anglophile") one having a love for कशाविषयीतरी / कुणाविषयी प्रेमभाव बाळगणे.
- *Philology* = having a liking for words शब्दांवर म्हणजेच भाषेवर प्रेम करणे = भाषाप्रभुत्व मिळविणे.

[20]अर्थात हा प्राचीन अर्थ नंतर कायम राहिला नाही. अनेक तत्त्ववेत्त्यांनी आणि तात्त्विक विचारप्रणालींनी Philosophy चा अर्थ त्या त्या कालाला सुसंगत बनविण्याचा प्रयत्न केला. प्रस्तुत ग्रीक अर्थानुसार ईश्वरास अस्तित्व आहे. पण अनेक विचारवंत निरीश्वरवादीही होते.अशा तत्त्ववेत्त्यांनी वेगळी व्याख्या करण्याचा प्रयत्न केला.विसाव्या शतकात करण्यात आलेल्या काही व्याख्या पुढीलप्रमाणे :

- "तत्त्वज्ञान हा एक निर्जन प्रदेश आहे"(रसेल : प्राब्लेम्स ऑफ फिलॉसॉफी.)
- "तत्त्वज्ञान ही सतत विशिष्ट तऱ्हेचे प्रश्न विचारण्याची प्रक्रिया आहे." (हॅरी शोफिल्ड : दि फिलॉसॉफी ऑफ एज्युकेशन - ॲन इंट्रोडक्शन )
- "विचारांचा विचार म्हणजे तत्त्वज्ञान" (ॲटनी फ्ल्यू).



DEPARTMENT OF PHILOSOPHY SANGAMNER COLLEGE

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*

की, जी वस्तू भौतिक नाही,जी कोणत्याही ज्ञानेंद्रियाद्वारे अनुभवास येत नाही,अभौतिक, अमूर्त शहाणपणावर प्रेम करायचं म्हणजे नेमकं काय करायचं ? या प्रज्ञानाचे स्वरुप काय ?

**शहाणपण आणि बुध्दिमत्ता** (Wisdom & Intelligence) यात ग्रीक विचारवंत फरक करतात. बुध्दिमान माणूस कदाचित 'चालता बोलता विश्वकोशही असेल' पण म्हणून तो शहाणा असेल असे नाही.म्हणजेच तो नीतीमान असेलच असे नाही.बुध्दिमान असून ही तो दुष्ट असू शकतो. प्रज्ञानी माणूस मात्र एक नैतिक माणूस असतो.किंबहुना नीतीमान असणे, हीच शहाणपणाची, प्रज्ञानी असण्याची पूर्वअट असते,असा ग्रीकांचा दृष्टिकोन होता.त्यांच्या मते माणसाची बुध्दिमत्ता नैतिकतेला पूरक ठरु शकते.मात्र ती आवश्यक अट नसते. एखादा निरक्षर माणूसही शहाणा असू शकतो.



## Wisdom प्रज्ञानाचा अर्थ

आता येथे 'प्रज्ञान' (Wisdom) या शब्दाचा अर्थ तपासला पाहिजे. ग्रीकांच्या मते Wisdom चे काटेकोर अर्थ अपेक्षित आहेत.ते दोन प्रकारचे आहेत : पहिला दैवी प्रज्ञान आणि दुसरा मानवी प्रज्ञान. Wisdom च्या अर्थाची ही दुहेरी संकल्पना सर्वप्रथम ग्रीक तत्त्वज्ञ पायथागोरसने मांडली.ती नंतरच्या ग्रीक विचारवंतांनी उचलून धरली.

पाथागोरस स्वत:ला जगातील पहिला तत्त्ववेत्ता समजतो. त्याचे गणिती प्रमेय आपणास शाळेत माहित झालेले असतेच, पण तो मुळात तत्त्ववेत्ता आणि प्रगल्भ, उच्च दर्जाचा गणिती होता. तो अतिशय पवित्र आणि साधू जीवन जगला.

## Philosophy चा शोध : पायथागोरस

Philosopher आणि Philosophy हे शब्द पायथागोरसनेच शोधले, असे म्हणतात.[21] पायथागोरसच्या काळी ग्रीसमध्ये गुरुने ज्ञानदान केवळ ज्ञानाच्या प्रसारासाठीच करावे,पैशासाठी करु नये, असा समज होता.कारण Wisdom म्हणजे ईश्वराचे ज्ञान. ही पवित्र गोष्ट असून ईश्वर ज्यांच्यावर कृपा करतो त्यांनाच तो 'प्रसाद' म्हणून ज्ञान देतो, अशी त्याकालात समजूत होती.

त्याकाळात सोफिस्ट Sophist[22] या नावाचे तत्त्वज्ञ होते. ते स्वत:ला wise men समजत आणि त्यांचा तत्कालिन ग्रीक लोकशाहीवर मोठा प्रभाव होता.ते रोख पैसे घेवून शिकवित असत.त्यामुळे पायथागोरस त्यांना ***भाडोत्री विद्‌वान*** मानत असे. त्यांचा उपहास करण्यासाठी आणि त्यांची हीनता स्पष्ट करण्यासाठी पायथागोरसने स्वत:ला ज्ञानी अथवा wise न समजता *शहाणपणाचा प्रेमिक* म्हणवून घेण्यास सुरुवात केली.या अर्थाने तो स्वत:ला 'शहाणपणाचा प्रेमी Philosopher समजत असे.याचाच अर्थ sophist या शब्दाचा प्रतियोगी - विरुद्ध अर्थाचा शब्द म्हणून पायथागोरसने Philosopher शब्दाची योजना केली. आणि ज्ञानाचा दर्जा उंचावण्यासाठी Philosophy[23] हा शब्द शोधला.

DEPARTMENT OF PHILOSOPHY SANGAMNER COLLEGE

---

[21] पायथागोरसचे शिष्य हेरॉक्लीडस, पॉन्टीकस आणि डायोजेनीस लॅरेटीयस यांच्या लेखनात हे उल्लेख आहेत, असे सिसिरो Marcus Tullius Cicero (03 January 106 BC – 07 December 43 BC) हा रोमन तत्त्ववेत्ता, राजकीय सिध्दान्तकर्ता,इतिहासकार व कवी म्हणतो.पण दुर्दैवाने ते लेखन उपलब्ध नाही.

[22] Sophisticated असा इंग्लीश शब्द असून त्याचा अर्थ उच्चभ्रू, शिष्ट, अंहकारी, स्वत:ला शहाणा समजणारा, असा आहे.

[23] शहाणपण / प्रज्ञान या अर्थाने *Philosophein* हा शब्द सर्वप्रथम अथेन्सचा राजकारणी धुंरधर नेता पेरिक्लीस (इ.स.पू.493 ते 429)याने वापरल्याचे थुसिडीडस (इ.स.पू.443 .. .) या ग्रीक इतिहासकाराचे म्हणणे आहे.त्याच अर्थाने *Philosophia* हा शब्दही

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*




'Philosophy = Love of Wisdom = प्रज्ञानाविषयी प्रेम ' असे समीकरण पायथागोरसने केले, त्यामागे आणकी एक महत्वाचे कारण आहे.त्या कालात ऑलिम्पियाडच्या स्पर्धा होत असत.त्या स्पर्धांसाठी येणाऱ्या माणसांना पाहून पायथागोरसने माणसांचे तीन प्रकार केले.

1) **Lovers of gain** : सर्वात खालच्या दर्जाचे लोक (गर्दी पाहून नफा कमाविण्यासाठी ) खरेदी - विक्री करणारे
2) **Lovers of honor**: स्पर्धेत भाग घेण्यासाठी येणारे लोक, हे थोडे वरच्या दर्जाचे.
3) **Lovers of wisdom**: सर्वात उच्च दर्जाचे लोक म्हणजे हा सारा खेळ पाहणारे प्रेक्षक होय.

पैशासाठी जगणाऱ्या आणि त्यासाठी जीवघेणी स्पर्धा करणाऱ्या माणसांच्या जगाकडे आणि विश्वाच्या पसाऱ्याकडे पाहणाऱ्या तटस्थ प्रेक्षकालाच पायथागोरस **Lovers of Wisdom** म्हणतो.तेच खरे ***Philosopher.*** त्यांना जाणवणारे प्रज्ञान दैवी असते, असे पायथागोरस समजत असे.

**अ) दैवी प्रज्ञान : पायथागोरसचे मत**

**Pythagoras of Samos**
इ.स.पू.570 ते 495
An Ionian Greek philosopher,
Mathematician, and founder of
The religious movement called
*Pythagoreanism*



पायथागोरसच्या मते हे विश्व सुव्यवस्थितपणे रचले गेले आहे.ती रचना समजणे खरे तर मानवी आकलना पलिकडे आहे.तरीही दृश्य विश्व आणि मानवी मन यांचे जे काही ज्ञान माणसाला होते, त्यावरुन आपण विश्वाच्या रचनेचा अंदाज बांधू शकतो.हा अंदाज पाहता ही रचना करणारा ईश्वर हाच खरा प्रज्ञानी आहे, असे लक्षात येते.माणूस (आपण) प्रज्ञानी नाहीच.तो अशी रचना करूच शकत नाही, असे पायथागोरस मानत असे.साहजिकच सोफिस्टांना प्रज्ञानी माणूस मानण्याचे कारण नाही, असे पायथागोरसचे मत होते.

विश्व ही ईश्वराची निर्मिती व रचना आहे,याचा अर्थ माणूसही ईश्वरी निर्मितीच आहे.ईश्वर, अग्नी,वायू,इत्यादी चार मूलतत्त्वे, वनस्पती आणि प्राणी यांनी मिळून हे विश्व बनले आहे. 'प्रज्ञान' हा केवळ ईश्वरी गुण असल्याने माणूस प्रज्ञानी असू शकत नाही. 'ईश्वरासह या विश्वातील अंतिम सत्ये भव्य असून त्यांची ज्ञानप्राप्ती करून घेणे अतिकठिण आहे.जवळपास ती शक्यच नाही.

वापरला गेला : रॉबिन ओस्बर्न *दि पोलिस अॅण्ड इट्स कल्चर चॅप्टर वन* पान 09 रोटलेज हिस्ट्री ऑफ फिलॉसॉफी व्हॉल्यूम वन - सी.सी.डब्ल्यू टेलर 1997.

DEPARTMENT OF PHILOSOPHY SANGAMNER COLLEGE

ईश्वरच प्रज्ञानी असेल तर माणूस मुर्ख आहे काय ? तर नाही.[24] ग्रीकांच्या मते माणूसही प्रज्ञानी आहे. पण माणसाच्या प्रज्ञानाचे स्वरूप ईश्वराच्या प्रज्ञानापेक्षा भिन्न आहे.

**ब) मानवी प्रज्ञानः अज्ञानाची कबुलीः सॉक्रेटीसचे मत**

माणूस जन्ममृत्युने बांधला गेलेला आहे. त्याचे आयुष्य मर्यादित आहे. साहजिकच त्याच्या क्षमताही मर्यादितच आहेत. या क्षमतांच्या तुलनेत त्याचे ईश्वराविषयीचे, विश्वाविषयीचे,विश्वातील अनेक तत्त्वांविषयीचे ज्ञान मर्यादित आहे.त्यात जन्ममृत्यूच्या अज्ञानाची भर तर आहेच आहे. म्हणजेच माणूस अनेक बाबतीत अज्ञानी आहे.पण हे त्याने कबुल केले पाहिजे.व्यवहारात आपण पाहतो की अनेक माणसे स्वत:ला शहाणी समजतात, इतरांना अज्ञानी.

आपले आयुष्य, क्षमता आणि ज्ञान मर्यादित आहे, हे भान माणूस विकसित करीत नाही. माणसाचे ज्ञानच मर्यादित आहे , हे ओळखत नाही, हे माणसाचे अज्ञान असून तेच नेमके जाणणे, हेच माणसाचे प्रज्ञान होय, अशी ग्रीकांची धारणा आहे.

थोडक्यात ईश्वरी प्रज्ञानाचे ज्ञान होवू शकत नाही आणि स्वत:चे ज्ञान तर मर्यादितच आहे; मर्यादा म्हणजे अनेक बाबतीत अज्ञान असणे.तेंव्हा स्वत:च्या अज्ञानाचे ज्ञान असणे हाच ***मानवी प्रज्ञान*** होय. आपली मर्यादा कबूल करण्याची माणसाची ही विनम्रताच तर त्याच्या 'प्रज्ञानी' असण्याचे प्रसादचिन्ह आहे.

पायथागोरसची ही भूमिकाच नंतर ग्रीक तत्त्वज्ञानाचा मुगुटमणी सर्वश्रेष्ठ तत्त्ववेत्ता सॉक्रेटीसची (इ.स.पू.469- 399) अधिकृत भूमिका बनली. म्हणूनच तर सॉक्रेटीस स्वत:ला नम्रपणे अज्ञानी समजतो. तो म्हणतो *"I do not think, that I know ; what I do not know "*[25] मी असा विचार करीत नाही की, मला जे माहित नाही ते मला माहित आहे" याचा अर्थ असा की मला काहीही ज्ञान नाही आणि असलेच काही ज्ञान तर मला माझ्या अज्ञानाचे ज्ञान आहे" अशा स्पष्ट शब्दात अज्ञान कबूल करणारा सॉक्रेटीस हा जगातील शहाणा माणूस आहे. (आजही ! )

वेगळ्या भाषेत सांगावयाचे तर ग्रीकांचे म्हणणे असे की माणसाकडे त्याची स्वत:ची बुद्‌धि आहे.तो ती पूर्णपणे पणाला लावतो आणि ज्ञानप्राप्ती करुन घेतो. मात्र त्याच्या पहिल्या ज्ञानाचा विषय त्याचे *अज्ञान* हाच असला पाहिजे. एकदा स्वत:चे अज्ञान त्याला कबूल झाले की मग तो ज्ञानाच्या शोधार्थ निघेल.या प्रवासात ज्ञानदेवीची याचना करुन जे काही त्याच्या भिक्षापात्रात पडते त्यातून तयार होते ती त्याची *'स्वत:च्या शहाणपणाची'* गोष्ट.

DEPARTMENT OF PHILOSOPHY SANGAMNER COLLEGE

---


[24]माणसाचे वैशिष्ट्य असे की हे अनंत ज्ञान प्राप्त करून घेण्यासाठी माणसाला ईश्वराने बुद्‌धिची देणगी दिलेली आहे.ती इतर प्राण्यांना दिलेली नाही. समस्त प्राण्यांपैकी केंवळ मानवालाच ईश्वर आपले दिव्य ज्ञान देतो.कारण मानवाचे मूळ स्वरूप दिव्य आहे. हे दिव्य आत्मरुप जाणण्यानेच माणूस अमर बनू शकतो. माणसात या विश्वाचे परिपूर्ण प्रतिबिंब पडले असून माणूस हा अनंत विश्वाचे लघुरुप आहे.'जे पिंडी ते ब्रह्माण्डी ' ही पायथागोरसची धारणा होती. आणि हे आत्मरूप जाणण्याचा मार्ग म्हणजेच तत्त्वज्ञानाचा अभ्यास करणे होय. विश्वाचे स्वरूप जाणण्याचा मार्ग म्हणजे खगोलशास्त्र, संगीत, गणित आणि विज्ञान यांचा अभ्यास करणे. तथापि हा अभ्यास केवळ बौद्‌धिक कसरत या स्वरुपाचा असता कामा नये तर जवळपास ती ईश्वराची आराधना, भक्ति या दर्जाची असली पाहिजे. ज्ञानप्राप्ती ही भक्ति करणे होय, असे पायथागोरसचे मत होते .

[25]एका प्रसिध्द राजकारणी माणसाकडे सॉक्रेटीस गेला.त्यांची प्रश्नोत्तरे झाली त्यावेळी सॉक्रेटीसने जो विचार केला तो असा " या माणसापेक्षा मी शहाणा आहे.कदाचित असे असेल की जाणण्यासारखे काही आम्ही दोघेही जाणत नसूच, पण त्याला असे वाटते की त्याला काहीतरी माहित आहे पण वास्तवात त्याला माहित नाही. (आता,) मला (तर ) हे ही मला माहित नाही की मला माहित आहे की नाही. या संदर्भात या मर्यादेपर्यंतच त्याच्यापेक्षा मी शहाणा आहे. मी शहाणा आहे, मी असा विचार करीत नाही . (फक्त) मी असे म्हणत आहे की मला जे माहित नाही ते (मात्र) मला माहित आहे " (म्हणजेच मला काय माहित नाही, ते मला माहित आहे ) ॲपॉलॉजी 21e

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*




मानवी शहाणपणाची ही गोष्ट त्याने स्वत:च्या विवेकबुद्धिने उत्स्फूर्तपणे आणि सत्यप्राप्तीसाठी जाणता-अजाणता केलेली धडपड आहे.त्याची विवेकशक्ति ईश्वरी नसून नैसर्गिक आविष्कार आहे.आपल्या बुद्धिला अपार कष्ट करायला लावण्यात माणसाने माणूस म्हणून वेगळा मानवी शहाणपणाच सिध्द केला आहे.याच अर्थाने तत्त्वज्ञान ही त्याची ज्ञानयात्रा व जीवनयात्रा आहे.माणसाचा शहाणपणा सत्याच्या शोधासाठी आहे. सत्य हेच माणसाचे अंतिम ध्येय असले पाहिजे, सत्यासाठी माणसाने प्राणाची बाजीही लावण्यास तयार असले पाहिजे, हा त्यांचा आग्रह आहे.


सॉक्रेटीस (इ.स.पू.469- 399)

थोडक्यात, --

अ)ग्रीकांच्या मते प्रज्ञान (Wisdom) हा केवळ ईश्वराचाच गुण असतो. या विश्वाचा निर्मिक, सर्वज्ञ, सर्व शक्तिमान,विश्वाचा चक्रवर्ती इत्यादी स्वरुपाचे असण्यातच परमेश्वराचे प्रज्ञान दडलेले आहे. हे असे उदात्त स्वरुप हेच ईश्वराचे 'प्रज्ञान' (Wisdom) आहे.' प्रज्ञान ' हा दैवी गुण असल्याचे भान ज्यांना येते ती माणसे म्हणूनच अतिशय सावध भूमिका घेतात : ती माणसे स्वत:ला 'प्रज्ञानी माणसे' (Wise men) समजत नाहीत तर केवळ *प्रज्ञानाचे प्रेमिक' (The Lover of Wisdom = Philosopher)* म्हणवून घेतात. या अर्थाने ग्रीक परंपरेत इतिहासकार ज्याला Philosopher समजतात तो पहिला ग्रीक विचारवंत म्हणजे, - थेल्स Thales (इ.स.पू.625 ते 647).



थेल्स Thales (इ.स.पू.625 ते 647).

ब ) माणूसही प्रज्ञानी आहे.अर्थात त्याचे स्वरूप वेगळे आहे. प्राण्याकडे प्रज्ञान असू शकत नाही 'प्रज्ञान' हे मानवी व्यक्तीकडेच असणारे वैशिष्ट्य आहे.पण म्हणून माणसात सुध्दा प्रत्येक व्यक्ती प्रज्ञानी असेल असे नाही. काहीजणच प्रज्ञानी असतात.बहुतेकजण स्पर्धेत उतरलेले असतात. या काटेकोर अर्थाने असे म्हणता येईल की 'मानवी प्रज्ञान म्हणजे सारासार विवेक, सारासार विचार,तारतम्य,commonsense' होय. त्यात न्याय, प्रेम, करुणा, ज्ञान सहिष्णुता, वैचारिक उदारता अशा सदगुणांचा प्रज्ञानात सामावेश असतो.

DEPARTMENT OF PHILOSOPHY SANGAMNER COLLEGE

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*

इथे काही संकल्पनांमध्ये फरक करता येईल, असे दिसते. प्रज्ञानाचे स्वरुप समजण्यासाठी आकलन आणि प्रज्ञान (Understanding and Wisdom) यात फरक करता येईल. तसेच ईश्वरी ज्ञानाच्या मानवी आकलनाचा दावा करणारे धर्म (Religion) हे ज्ञानविश्व आणि पायथागोरस, सॉक्रेटीस यांचा पुरस्कार करणारी ग्रीकांची तत्त्वज्ञ (Philosophy) ही संकल्पना. म्हणजेच धर्म आणि तत्त्वज्ञान या संकल्पनांमध्ये वेगळ्या रितीने पाहता येईल.



**आकलन आणि प्रज्ञान (Understanding and Wisdom)**

मानवी प्रज्ञान हे मुख्यत: जग आणि जगाचे नियम, जग आणि मानव यांचा परस्परसंबंध समजावून घेणे यात गुंतलेले असते. माणसाच्या आकलन क्षमतेच्या माध्यमातून हे संबंध जाणले जातात. म्हणून ईश्वरी कृती अथवा निर्मितीचे आकलन हा माणसाच्या आकलनक्षमतेचा आविष्कार आहे, असे रास्तपणे म्हणता येईल.

ईश्वर प्रज्ञान हे तर उघडच ईश्वराचे स्वरुप आहे. त्याचे आकलन करुन घेण्याचा प्रश्न खरा तर उद्‌भवू शकत नाही, त्याविषयी केवळ अंदाज करता येतील. ईश्वरी प्रज्ञानाचे पैलू जसजसे मानवी आकलनक्षमतेच्या कक्षेत येतील, तसे विश्वाचे ज्ञान विकसित होईल. म्हणजेच विज्ञानाचा  विकास होईल. मानव ही सुद्‌धा ईश्वरी निर्मितीच असलयाने मानवाविषयीची ज्ञानकक्षा विस्तारणे म्हणजेच सामाजिक विज्ञानाचा विकास होणे, असे मानता येईल.

**धर्म आणि तत्त्वज्ञान**

इथे, आणखी एक फरक करणे आवश्यक आहे. ईश्वराचे प्रज्ञान जाणणे आणि त्याच्याप्रती निष्ठा, भक्ति बाळगून त्याच्या चरणी लीन होणे या इच्छा माणसाच्या मनात निर्माण होतात. यातून ‘धर्म’ ही सामाजिक संस्था अस्तित्वात येते. धार्मिक माणूस, धर्मवेत्ते, धर्मगुरु ईश्वरी ज्ञान प्राप्त झाल्याचा दावा करतात. तत्त्वज्ञ असा दावा करीत नाही.

धर्म आणि तत्त्वज्ञान ही दोन्ही ज्ञानाची क्षेत्रे ‘अंतिम सत्याचा शोध’ हे एकच ध्येय स्वीकारतात. पण त्यांचे मार्ग भिन्न आहेत.धर्म श्रध्देच्या मार्गाने तर तत्त्वज्ञान चिकित्सेच्या मार्गाने जातो.धर्माची तत्त्वे गूढ अनुभूतीने कळू शकतात, असा दावा असतो; तर तत्त्वज्ञान गंभीर चिंतनानेच लाभते.

तत्त्वज्ञान विज्ञानाला जन्म देणारे असल्याने ते काटेकोर असते. ते प्रथम अनुभवावर विश्वास ठेवते.अंधश्रध्दांना वगळते.ते सतत विकसनशील असते.बदलत राहाते.तर धर्म ताठर,न बदलणारा  आणि श्रध्दा व अंधश्रध्दा यात फरक न करणारा असतो. तो ज्ञान निर्माण करु शकत नाही.समाजाला तो बदलू शकत नाही.तत्त्वज्ञान समाज परिवर्तन करते,सुधारणा करते.समाजाचा विकास करते.

**ब) तत्त्वज्ञानाची पाश्चात्य व्याख्या:**

(2)तत्त्वज्ञान म्हणजे विश्वाचे एकत्रित अवलोकन

हे विश्व अनेक वस्तू,पदार्थ,घटना,प्राणी आणि व्यक्ति या विविध घटकांनी बनलेले आहे.हे घटक विश्वात केवळ टाकलेले नाहीत.त्यांच्यात काहीतरी कार्यकारणसंबंध आहे,नाते आहे.प्राणी चेतनामय आहेत तर वस्तु,घटना जड आहेत.अंतिम सत्य किंवा कारण जर एकच असेल तर असे परस्परविरुध्द गोष्टी निर्माण कशा झाल्या? त्यांच्यात सुसंगती कशी शोधावी ? मग विश्व चैतन्यमय आहे की जड आहे ? असा प्रश्न पडतो.

शिवाय ज्या विविध गोष्टी आजूबाजूला दिसतात त्यांच्यात काही संबंध आहेत, हे खरेच.पण हे संबंध आंतरिक आहेत की बाह्य ? दोन वस्तूंमधील  संबंध आणि दोन व्यक्तिमधील संबंध एकच असतो की भिन्नभिन्न ?

DEPARTMENT OF PHILOSOPHY SANGAMNER COLLEGE

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*



उष्णता आणि मेण यांचा संबंध वितळणे असा दिसतो.पण अहमदनगर ते मुंबई व्हाया नासिक हा कसला संबंध आहे? व्यक्तिमधील प्रेम या संबंधाचे स्वरुप काय ? ते देशप्रेमासारखे , मानवप्रेमासारखेच असते का ?

कारण नावाचे तत्त्व खरेच असते का ? की एकामेकामागे काही घटना घडत असतात एवढेच ? सूर्य मावळणे हे सूर्य उगवण्याचे कारण आहे का ? की कारण ही आपली व्यक्तिगत भावना आहे ?अशा विविध प्रकारच्या परस्परविरोधी गोष्टींकडे व्यापक दृष्टिकोनातून पाहणे, त्यांचे अवलोकन करणे हेच तत्त्वज्ञान होय.

### 1.2 : तत्त्वज्ञानाच्या शाखांचा परिचय

Philosophy (Love of Wisdom) आणि तत्त्वज्ञान या शब्दांमधून तत्त्वज्ञानाचा अभ्यास विषय स्पष्ट होतो, हे खरे. पण तो पुरेसा स्पष्ट होत नाही.आपण गणित, इतिहास, जीवशास्त्र, अर्थशास्त्र, हिंदी, संस्कृत, उर्दू, इंजिनिअरींग, पेंटींग, चित्रकला इत्यादी विविध विषयाचा अभ्यास करतो. प्रत्येक विषयाचा एक स्वतंत्र अभ्यास विषय असतो. अर्थशास्त्र समाजातील आर्थिक रचनांचा व घडामोडींचा अभ्यास करते. भौतिकशास्त्र, भौतिक नियम शोधते तसा तत्वज्ञानाचा अभ्यास विषय कोणता ?

तत्वज्ञान कशाचा विचार करते? कशाचे चिंतन करते? त्या चिंतनाचे स्वरुप काय? तर कोणत्याही विषयाचे मूलभूत विचार म्हणजे तत्वज्ञान असे म्हणता येते.एका दृष्टिने असे म्हणता येईल की तत्त्वज्ञानाला विषयाचे बंधन नसते.कोणत्याही विषयाचे मुळापासून चिंतन करणे,त्याची सखोल चिकीत्सा करणे, त्या विषयाच्या सर्वसामान्य स्वरूपाचे चिंतन करणे म्हणजे *त्या विषयाचे तत्त्वज्ञान* असे म्हणता येईल.

गेल्या काही शतकांमध्ये तत्त्वज्ञानाने जे चिंतन केले त्याचे वर्गीकरण केले तर हे चिंतन मुख्यत: चार विषयविश्वांचे आहे.त्यानुसार तत्त्वज्ञानाच्या शाखाही तयार झाल्या आहेत. हे विषय व या शाखा पुढीलप्रमाणे :

| अनुक्रम | तत्त्वज्ञानाचे विषय | तत्त्वज्ञानाच्या शाखा |
|---|---|---|
| 01 | विचारांचे नियम | **1.तर्कशास्त्र** (Logic) |
| 02 | ज्ञानाचे स्वरूप व निकष | **2.ज्ञान शास्त्र** (Epistemology) |
| 03 | दृश्य विश्व, विश्वातील पदार्थ व विश्वाबाहेरील तत्त्वे - परतत्त्वे | **3.सत्ता शास्त्र** (Metaphysics) |
| 04 | मूल्ये | **4. नीति शास्त्र** (Ethics)<br>**5.सौंदर्य शास्त्र** (Aesthetics) |

यांचा परिचय आपण पुढील प्रकरणांपासून करून घेवू :

------------------------------------------

DEPARTMENT OF PHILOSOPHY SANGAMNER COLLEGE